क्र.का.१२/मू/परतावा/ ६४९ ते ६७९
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे १.
दिनांक : २१/३/१९९६

प्रति,

सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व मुद्रांक जिल्हाधिकारी
सह जिल्हा निबंधक.

विषय :- मुद्रांक परतावा मंजूर करणेबाबत.

**प रि प त्र क :-**

मुंबई मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४८ अन्वये मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यांच्या आत पक्षकाराने मुद्रांक परतावासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे. याकरीता परताव्यासाठी प्राप्त झालेले अर्ज विहित मुदतीत आहे किंवा काय हे मुद्रांक जिल्हाधिकारी यांची अर्जावरील सही व दाखल दिनांक यावरून पडताळून पहावे लागले. परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही मुद्रांक जिल्हाधिकारी यांची परतावा अर्जावर दाखल तारखेसह सही नसते. काही अर्जावर फक्त आवक नोंदीचा शिक्का असतो, त्यामुळे काही वेळेस अर्जाच्या मुदतीबाबत साक्षंकता निर्माण होते.

वरील बाब लक्षात घेता सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व मुद्रांक अधिक्षक यांनी प्रत्येक परतावा अर्जावर दिनांकासहित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्यथा परतावा मंजूर केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

परतावा प्रकरणातील प्रतिज्ञापत्राच्या संदर्भात या कार्यालयाचे दि. २९/८/९४ चे परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या नमुन्यातील, संबंधित प्रकरणात आवश्यक असलेल्या मुद्यांपुरतेच प्रतिज्ञापत्र मर्यादित न ठेवता दिलेल्या संपूर्ण नमुन्यातच प्रतिज्ञापत्र पक्षकारांकडून सादर करून घेण्यात येते. ही बाब समाधानकारक नाही. तरी वरील सूचनेप्रमाणेच प्रतिज्ञापत्र पक्षकारांकडून घेण्यात यावे.

का.प्र.मा.नों.म.नि.
यांचे सहीची असे.

सही /-
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे करीता.